दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक ११३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१७ जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com








# यंदा दहावीचा निकाल ९९.९५ टक्के, मुलींचीच बाजी

## कोकण विभागाचा 100% निकाल ; ९५७ विद्यार्थ्यांना 100 टक्के गुण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे २०२१ मध्ये अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे तयार करण्यात आलेला दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. पत्रकार परिषद घेऊन मंडळ अध्यक्ष दिनकर पाटील यांनी निकालाची घोषणा केली. यंदा दहावीचा निकाल ९९.९५ टक्के लागला असून यंदाही निकालात मुलींनीच बाजी मारली आहे.**

यंदाच्या निकालात दहावीच्या २७ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तर दहावी परी–क्षेत कोकण विभागाने बाजी मारली असून कोकण विभागाचा निकाल १०० टक्के लागला आहे. दहावीच्या निकालात ९५७ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले आहेत. या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५ लाख ७५ हजार ८०६ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी



१५ लाख ७५ हजार ७५२ विद्यार्थ्यांची संपादणूक शाळांकडून प्राप्त झाली आहे. त्यापैकी १५ लाख ७४ हजार ९९४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी ९९.९५ आहे.

या परीक्षेस राज्यातील नऊ विभागीय मंडळामधून एकूण ८२ हजार ८०२ पुनर्परिक्षार्थी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८२ हजार ६७४ विद्यार्थ्यांची संपादणूक शाळांकडून प्राप्त झाली आहे त्यापैकी ७४६१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यांची एकूण निकालाची टक्केवारी ९०.२५ आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थ्यांचा कोकण विभागाचा निकाल (१००%) सर्वाधिक असून सर्वात कमी निकाल नागपूर विभागाचा (९९.८४%) आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित विद्यार्थीनींचा निकाल ९९.९६% असून विद्यार्थ्यांचा निकाल ९९.९४% आहे. म्हणजेच विद्यार्थीनींच्या निकालाची टक्केवारी विद्यार्थ्यांपेक्षा ०.०२% ने जास्त आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांचा निकाल ९७.८४% लागला आहे.

## संक्षिप्त...

### फुंडे बसस्टॉप जवळील पुल वाकला : पडण्याचा धोका

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

पनवेल राज्य मार्ग क्र.१०३ या उरण तालुक्यातील फुंडे कॉलेज ते बोकडविरा रस्त्यावरील फुंडे सिडको बस थांब्यावरील असलेला आणि सिडको प्रशासनाने बांधलेला पूल हा कमकुवत झाला असल्याचे यापुर्वीच घोषित करण्यात आले असून आत्ता हा पुल स्पष्टपणे वाकला असल्याचे दिसून येत आहे आणि कधीही पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

त्यामुळे उरण – पनवेल राज्य मार्ग क्र.१०३ या रस्त्यावरील फुंडे सिडको बसथांबा येथील पुलावरून सर्वच प्रकारच्या अवजड वाहनांस जाण्यास पूर्णतः प्रवेश बंदी घोषित करण्यात आली आहे. उरण कडून पनवेलला जाणारी वाहने बोकडविरा एम.एस.ई.बी.कॉलिनी येथून उजवीकडे वळण घेऊन बी.पी.सी.एल.कंपनी,भेंडखळ येथून डावीकडे वळण घेऊन नवघर सर्कल पासून सिडको पुलावरून उजवीकडे वळण घेऊन जेएनपीटी टाऊनशिप मार्गे इच्छित स्थळी जाण्याचा पर्याय सुरू करण्यात आला आहे. तर पनवेल कडून व अन्य ठिकाणच्या अवजड वाहनांनी पर्याय दिलेल्या मार्गावरून किंवा करंजा जेटी कोस्टल रोड वरून उरण कडील इच्छित मार्गाकडे जाण्याचा पर्याय आहे. सदरची अधिसूचना ही पोलिस वाहने, रुग्णवाहिका व अन्य सेवेतील वाहनांना लागू होणार नाही. असेही वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.या शिवाय कोणीही जीवाशी खेळ न खेळता याची दक्षता घ्यावी असे आवाहन केले आहे.

# उरण चारफाटा येथे १ लाख २० हजारांचा गांजा जप्त

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पोलिसांनी चारफाटा छापा टाकून सहा किलो गांजा जप्त केला आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक केली असून एक आरोपी फरार आहे. प्रितम प्रभाकर नायर (२६)धंदा – नोकरी, डाऊरनगर चर्च जवळ,उरण व राहूल केशव धुमाळ (२६)धंदा – रिक्षा चालक रा. डाऊरनगर, उरण येथील रहिवासी असून, १ लाख २० हजार रुपये किंमतीचा आमली पदार्थ असलेला गांजा बेकायदेशीररित्या विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःचे जवळ आढळून आल्या प्रकरणी गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क),२०(ब) कारवाई करून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाल्यानंतर १५ जुलै २०२१ रोजी उरण चारफाटा येथिल बिन्नी गॅरेज जवळ उरण पोलिसांनी सापळा रचून संबंधितांच्या हालचालींकडे लक्ष केंद्रीत करून यातील आरोपी प्रितम नायर आणि राहूल धुमाळ हे दोघेजण संशयास्पद रित्या वावरताना आढळल्याने त्यांची झडती घेतली असता त्यांच्याजवळ प्रत्येकी एक किलो प्रमाणे सहा गांजाचे निळ्या रंगाच्या प्लास्टिक पिशवीत तीन पॅकेटमध्ये एकत्र केलेला पाने, फुले, काड्या, बिया असे संलग्न असलेला उग्र वासाचा ओलसर अमली पदार्थ अस–लेला हा सहा किलो वजनाचा गांजाचे पुडके आढळून आले.

या प्रकरणातील विशाल श्रावण पायरे (१९) हा आरोपी या दरम्यान पळ काढून फरार होण्यात यशस्वी झाला आहे. तर जप्त करण्यात आलेल्या गांजाची बाजार भावाप्रमाणे १ लाख २० हजार रूपये एवढी किंमत आहे.तर या प्रकरणी उरणचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक रविंद्र बुधवंत यांच्या अधिपत्याखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक तुकाराम निंबाळकर, पोलिस उपनिरीक्षक सचिन वायकर आणि पोलिस पथकातील कर्मचारी यांनी ही कारवाई केली. या प्रकरणी उरण पोलिस अधिक तपास करत आहेत.या कारवाईमुळे उरण परिसरात गुप्तपणे आमली पदार्थ विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# रोहा वरसे येथे जावयाने केली सासऱ्याची हत्या; सासू जखमी



**दै.रायगड नगरी । रोहा**

तालुक्यातील वरसे ग्रामपंचायत हद्दीतील एकदंत सोसायटीमध्ये कौटुंबिक वादातून जावयाने सासरे दादुराम बोराणा (वय ५०) यांचा धारदार शस्त्राने वार करून खून केल्याने एकच खळबळ उडाली आहे. पतीला सोडवण्यासाठी गेलेल्या सासूवर देखील धारदार हत्याराने वार करून सासूला देखील जखमी केले आहे.

रोहे बाजारपेठेतील व्यावसायिक दादूराम बोराणा यांच्या मुलीचा विष्णू देसाई (रा. सेवादल आळी रोहा) याच्याशी प्रेमविवाह झाला होता. पण विष्णू देसाई याची पत्नी लग्नाच्या वर्षभरानंतर त्याला सोडून गेली होती. आपल्या पत्नीला तिच्या माहेरच्या लोकांनीच गायब केल्याचा संशय विष्णू देसाई याला होता.

'माझी बायको कुठे आहे' याचा जाब विचारण्यासाठी विष्णू सासरे दादूराम बोराणा यांच्या घरी गेला होता. पण 'आम्हाला तुझ्या बायकोबद्दल माहित नाही' असे त्याला वारंवार सांगण्यात येत होते. या सर्व गोष्टींचा राग मनात धरून आज दुपारी दीडच्या सुमारास विष्णू तलवार व अन्य धारदार हत्यारासह आपल्या सासऱ्याच्या घरी गेला. माझी बायको कुठे आहे? असे विचारू लागला. परंतु आम्हाला तिच्याबद्दल काही माहित नाही, असे सासऱ्याने सांगितल्याने त्याने धारदार शस्त्राने सासऱ्यावर वार केले.

त्यानंतर सासऱ्याला जिन्यावरून फरफटत बिल्डिंगच्या खाली नेऊन वार केले. संपूर्ण परिसरात रक्ताचे थारोळे पसरले होते. पतीला सोडवण्यासाठी गेलेल्या सासूवरदेखील जावयाने वार केल्याने तीदेखील गंभीर जखमी झाली असून रोहा उपजिल्हा रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरू आहेत.

सदर घटनेचे वृत्त समजताच उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी, पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर यांनी घटनास्थळी भेट दिली असून विष्णू देसाई याला ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी फिर्याद दाखल करण्याचे काम सुरू आहे

# अनिल देशमुख यांची ४ कोटींची मालमत्ता जप्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मनी लाँड्रिंग प्रकरणी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांची सक्तवसुली संचालनालयामार्फत चौकशी सुरू असतानाच आज कारवाईचे पुढचे पाऊल टाकण्यात आले असून देशमुख व त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावर असलेली ४.२० कोटी रुपये किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.



बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे याला अनिल देशमुख यांनी दरमहा १०० कोटी रुपये वसुलीचे टार्गेट दिले होते, असा आरोप मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी केला होता. त्या आरोपाच्या आधारे मुंबई हायकोर्टाच्या निर्देशानुसार अनिल देशमुख व त्यांच्या कुटुंबीयांची ईडी व सीबीआय मार्फत सध्या चौकशी सुरू आहे. याप्रकरणी सीबीआयने मूळ गुन्हा दाखल केलेला असून त्याच अनुषंगाने मनी लाँड्रिंग प्रकरणात अनिल देशमुख व कुटुंबीयांची ४.२० कोटी रुपयांची मालमत्ता आज जप्त करण्यात आली आहे.

जप्त करण्यात आलेली मालमत्ता अनिल देशमुख यांची पत्नी आरती देशमुख आणि प्रीमियर पोर्ट लिंक्स कंपनीच्या नावावर आहे. त्यात वरळी येथील १.५४ कोटी रुपये किंमतीचा फ्लॅट आणि उरण (रायगड) येथील धुतूम गावातील २.६७ कोटी किंमतीच्या जमिनीचा समावेश आहे. पीएमएलए अंतर्गत तात्पुरत्या स्वरूपात ही मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

वरळी येथील फ्लॅट आरती देशमुख यांच्या नावावर आहे. २००४ मध्ये या फ्लॅटची पूर्ण रक्कम रोकड स्वरूपात देण्यात आली होती. प्रत्यक्षात फेब्रुवारी २०२० मध्ये .../२

# शाळा नाही अन् शिक्षण ही नाही तरीही महापालिका वसूल करते शिक्षण शुल्क

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कोरोना सारख्या महामारीत नागरिकांचे आर्थिक कंबरडेच मोडले असताना मनमानी पद्धतीने शाळा फी वसुलीचे सत्र एकीकडे सुरू आहे. पनवेल महापालिका ही त्यामध्ये मागे राहिलेली नाही .महापालिकेच्या ज्या वसाहतीत पालिकेच्या शाळाही नाही आणि अद्याप पर्यंत शिक्षणही दिले नाही तरीही मालमत्ता करामध्ये शिक्षण शुल्क नागरिकांकडून जबरदस्तीने वसूल केले जात आहे. याबद्दल नागरिकांनी नाराजीचा सूर लावला आहे. जी सुविधा महापालिकेने दिलीच नाही त्याचा कर का भरायचा असा सामाजिक पण यक्ष प्रश्न कळंबोलीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश तुकाराम बगाडे यांनी केला आहे.त्यामुळे महापालिकेचा मालमत्ता कर आता पुन्हा वादात अडकला आहे.

महापालिका निर्माण करताना पहिली पाच वर्षे नागरिकांवर कोणताही कराचा बोजा लागणार नाही असं आश्वासन देऊनही नागरिकांना मालमत्ता कराची खास भेट पनवेल महापालिकेने दिल्याने पालिका क्षेत्रातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. ज्या सेवा महापालिकेने दिल्याच नाही त्याचा मेवा महापालिका मागत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. पालिकेने मालमत्ता कराची बिले नागरिकांच्या घडी धाडली आहेत. त्यामध्ये विविध प्रकारचे कर आहेत त्यात शिक्षण शुल्क ही नागरिकांना मोठ्या रकमेचे आकारले आहे. मात्र पनवेल शहरानजीकच्या भागात महापालिकेच्या जवळपास अकरा शाळा पनवेल नगरपालिका असल्यापासून शिक्षणाचे धडे देत .../२

# संभाव्य तिसऱ्या लाटेत उद्योगक्षेत्र सुरळित सुरु राहील याचे काटेकोर नियोजन करा : मुख्यमंत्री

## कामगारांची थेट वाहतूक, उद्योगानजिक तात्पुरती निवासव्यवस्थाबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील उद्योजकांशी संवाद साधून कोरोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेतही उद्योग सुरु राहतील यादृष्टीने काटेकोर नियोजन करावे, त्याचा एक परिपूर्ण आराखडा तयार करावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. मोठ्या कंपन्यांनी त्यांच्या कामगारांची राहण्याची व्यवस्था त्यांच्या उद्योगाच्या आवारात करण्याची तयारी पूर्ण करावी व ज्यांना हे करणे शक्य नाही त्यांना जिल्हाधिकाऱ्यांनी सहकार्य करून अशा उद्योगांच्या कामगारांसाठी कंपन्यांच्या समन्वयातून उद्योगस्थळानजिक फिल्ड रेसिडन्शीयल एरिया निश्चित करण्यास सहकार्य करावे, कामगारांना त्यांच्या कामाच्या स्थळी जा–ये करण्यासाठी पॉईंट टू पॉईंट वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करावे अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. कोणत्याही परिस्थितीत तिसरी लाट राज्यात येऊच नये यासाठी प्रयत्न करतांना दुर्दैवाने तिसरी लाट आली तर राज्यातील उद्योग सुरु राहिले पाहिजेत व



त्या माध्यमातून अर्थचक्र आणि जीवनचक्र याची गती कायम राहिली पाहिले असेही मुख्यमंत्री श्री.ठाकरे यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधिकारी तसेच उद्योग क्षेत्रातील काही प्रतिनिधींशी दूरदृष्यप्रणालीद्वारे संवाद साधला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महसुल मंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगमंत्री सुभाष देसाई, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, आरोग्य विभागाचे अपरमुख्य सचिव प्रदीप व्यास, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, आरोग्यसंचालक रामस्वामी यांच्यासह पोलीस महासंचालक संजय पांडे, सीआयआयचे पश्चिम विभागाचे चेअरमन त्यागराजन, महाराष्ट्र चेअरमन सुधीर मुतालिक .../२




# एकनाथी रामायण


पृथ्वीराज चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना भाजपचे आक्रमक आणि धडाडीचे नेते एकनाथ खडसे विरोधी पक्षनेते होते. तेव्हा देवेंद्र फडणवीस यांना सरकारवर हल्ले चढविण्यासाठी नाथाभाऊंनी जास्तीत जास्त संधी दिली. त्यानंतर महाराष्ट्रात सत्तांतर झाले तेव्हा खडसे यांना मुख्यमंत्रिपदाची आकांक्षा असण्यात काही चूक नव्हते. त्यांना महसूलसहित जवळपास १६-१७ खाती-विभाग मिळाली; पण त्यांना जे हवे होते, ते निसटले होतेच. राजकीय समीकरणातला असा बदल पचवून पुढे जाणे कठीण असते. ते खडसे यांना जमले नाही. मंत्री असतानाही त्यांच्या मनातली ठसठस कधी मंत्रिमंडळाच्या बैठकीत, कधी पत्रकारांशी बोलताना उमटत राहिली. 'मुख्यमंत्र्यांचा हाताला लकवा मारला आहे का' अशी भाषा प्रथम शरद पवार यांनी पृथ्वीराज चव्हाण यांच्याबाबत केली होती. तिचे अनुकरण उचित व आवश्यक नव्हते. आता न्या. दिनकर झोटिंग यांच्या एकसदस्य चौकशी समितीचा अहवाल अचानक बाहेर आल्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असलेल्या आणि सक्तवसुली संचालयालयाच्या चौकशीच्या फेऱ्यात सापडलेल्या एकनाथ खडसे यांच्या राजकीय वाटचालीवर नवे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. राजकारणात स्वच्छ असण्यापेक्षा स्वच्छ दिसणे आणि तपास यंत्रणा, समित्या, आयोग, न्यायालये यांच्या कचाट्यात न सापडता चाणक्याने म्हटल्याप्रमाणे माशासारखे नकळत पाणी पिता येणे हा निकष महत्त्वाचा असतो. एकदा ठरविले तर कुणाचाही निकाल लावणे अवघड नसते. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात आजही अशी उदाहरणे आहेत. ए. आर. अंतुले यांच्यापासून गेल्या चार दशकांत 'भ्रष्टाचार किंवा संशयास्पद व्यवहार' या कारणांमुळे मंत्रिपदे गेलेल्यांची संख्या कमी नाही. असे असतानाही न्या. झोटिंग समितीचा अहवाल मागच्या सरकारने सभागृहाच्या पटलावर का ठेवला नाही आणि 'या अहवालात एकनाथ खडसे यांच्यावर कोणतेही ताशेरे नाहीत' असे एका अत्यंत वरिष्ठ नेत्याने विधिमंडळात कसे काय सांगितले, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. न्या. झोटिंग यांचा सव्वातीनशे पानांचा अहवाल चाळला आणि त्यातली काही पाने नीट वाचली तर 'एकनाथ खडसे हे पुण्याजवळच्या भोसरी येथील एमआयडीसीची जमीन बाजारभावापेक्षा कमी किमतीत आपल्या नातलगांना मिळवून देण्यात दोषी आहेत,' हे अतिशय स्वच्छ शब्दांमध्ये आणि अनेकदा म्हटले आहे. एकनाथ खडसे यांनी आपल्या मंत्रिपदाला न्याय तर दिला नाहीच; पण गोपनीयतेच्या शपथेचाही भंग केला आहे, असा स्पष्ट ठपका न्यायमूर्तींनी ठेवला आहे. या अहवालाच्या ३१८ क्रमांकाच्या पानावर न्यायमूर्तींनी 'राज्य सरकारचे जबाबदार घटक या नात्याने या सरकारी मालकीच्या जमिनीचे संरक्षण करणे हे खडसे यांचे कर्तव्य होते. प्रत्यक्षात त्यांनी ही जमीन आपली पत्नी आणि जावई यांच्या नावावर कशी होईल हे पाहिले. हा कायद्याचा भंग होता. (त्यांच्यावरच्या) सार्वजनिक विश्वासाचा घात होता आणि मंत्री या नात्याने तर अनुचितच होता. राज्य सरकारने याची योग्य ती नोंद घ्यावी,' असे नमूद केले आहे. याचा निरीक्षणाचा अर्थ, राज्य सरकारने त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, असा होतो. ती त्या सरकारने केली नाही. खडसे यांचे मंत्रिपद न्या. झोटिंग यांचा अहवाल सादर होण्यापूर्वीच गेले होते. अहवाल आल्यानंतर खरेतर त्यांच्या राजकीय पुनर्वसनाच्या वाटा बंदच झाल्या होत्या. तरीही, ते गेल्या विधानसभेतील अगदी शेवटच्या भाषणापर्यंत आक्रमक राहिले. आपल्या पक्षकामाची साक्ष देत पक्षनेत्यांना दोष देत राहिले आणि अखेर 'राष्ट्रवादी'त गेले. आज खडसे यांचे जावई ईडीच्या कोठडीत आहेत. त्यांचीही ईडी चौकशी चालू आहेच. 'त्यांच्याकडे ईडी असेल तर आमच्याकडे सीडी आहे,' अशी वाक्ये टाळ्या घेण्यासाठी चांगली असतात. पण त्यामुळे तपास यंत्रणा किंवा न्यायव्यवस्था यांच्याकडून निर्दोष मुक्तता होत नाही. तशी ती होणे आवश्यक असते. एकनाथ खडसे हे उत्तर महाराष्ट्रातले प्रभावी लोकनेते आहेत. त्यांनी कमालीच्या प्रतिकूल वातावरणात पक्ष टिकवला आणि वाढवला. असे असताना आपल्या पक्षातून परागंदा होऊन दुसऱ्या पक्षाच्या वळचणीला जावे लागावे, यात पक्षांतर्गत स्पर्धेचे फटके तर आहेतच पण मंत्री म्हणून निर्णय घेताना सारासार विवेक खुंटीला टांगून ठेवल्याचीही फळे आहेत. परवा दोन दिवसांच्या छोटेखानी अधिवेशनात एका विरोधी नेत्याने ईडीच्या कारवाईचा केलेला धमकीवजा उल्लेख सध्या महाराष्ट्रातले राजकारण कसे चालू आहे, यावर प्रकाश टाकणारा होता. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार असतानाही एकनाथ खडसे यांच्या राजकीय कारकिर्दीवर न्या. झोटिंग यांच्या समितीचा अहवाल समोर आल्याने नवे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. खडसे यांनी आपले पक्षप्रमुख शरद पवार यांची भेट घेतली खरी; पण तीतून काय साधणार? सत्तेचा बेछूट वापर करणारे, बेबंद पैसा गोळा करणारे नेते या 'एकनाथी रामायणा'चा धडा घेणार नाहीतच. महाराष्ट्राच्या राजकारणाचा गेले चार दशके असाच तर प्रवास चालू आहे.

# कळंबोलीतील लोखंड बाजारामध्ये पेट्रोल पंप बसवण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथील लोखंड पोलाद बाजार हा आशिया खंडातील सर्वात मोठा बाजार आहे. मालाची ने आण करण्यासाठी हजारो लहान-मोठी व अवजड वाहने या बाजारामध्ये ये-जा करत असतात. परंतू लोखंड बाजारामध्ये एकही पेट्रोल पंप नसल्याने वाहनचालकांची गैरसोय होत आहे. वाहनचालकांची गैरसोय टळावी या आरक्षित असलेल्या पेट्रोल पंपाच्या भूखंडावर त्वरित पेट्रोल पंप बसवण्याची मागणी शिवसेना महानगरप्रमुख व वाहतूकदारांचे नेते रामदास शेवाळे यांनी केले आहे.

कळंबोली स्थित लोखंड पोलाद बाजार ३०२ हेक्टरवर वसला असून आशिया खंडातील सर्वात मोठा बाजार म्हणून गणला जातो. या बाजारामध्ये लोखंड पोलाद व्यापार्यांचे १९६० लहान मोठे व्यापारी गाळे आहेत. या ठिकाणी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर लोखंड पोलादाचा व्यापार होत असतो. त्या अनुषंगाने मालाची चढ-उतार आहे मोठ्या प्रमाणावर होते हजारो वाहनांची वर्दळ या बाजारपेठेत लागलेली असते. परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असूनही बाजारपेठत आरक्षित असलेल्या पेट्रोल पंपाच्या भूखंडावर पेट्रोल पंप बसवण्यासाठी लोखंड पोलाद बाजार समितीने आज तागायत कुठल्याही प्रकारची प्रकारचे प्रयत्न केलेले नाहीत. याठिकाणी वाहनचालकांना गाडीमध्ये माल लोड केल्यानंतर इंधन भरण्यासाठी मार्केट पासून दोन किलोमीटर लांब



पनवेलच्या दिशेने असलेल्या पेट्रोल पंपावर ती जावे लागत असल्यामुळे सायन-पनवेल महामार्गावरील कळंबोली सर्कल या ठिकाणच्या वाहतूक कोंडीचा सामना या अवजड वाहनांना करावा लागत आहे. परिणामी विनाकारण वाहनचालकांना इंधन खर्ची घालावी लागत आहे. लोखंड पोलाद बाजार मध्ये जर राखीव भूखंडावर पेट्रोल पंपाची व्यवस्था झाली तर वाहनचालकांच्या वेळेची व इंधनाची बचत होणार आहे. कळंबोली तलोजा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या पेट्रोल पंपासाठी च्या आरक्षित जागेवरील भूखंड क्रमांक ४५० हा ६६७ चौरस मीटरचा भूखंड बाजार समितीने पेट्रोल पंप चालू करावा किंवा इतर कुणासही वितरीत करून त्या ठिकाणी पेट्रोल पंप चालू करून वाहनचालकांची होणारी गैरसोय टाळावी अशी लेखी मागणी मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती कडे करण्यात आली आहे. यासंबंधात लोखंड पोलाद बाजार समितीचे कार्यक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकार्योंनी पेट्रोल पंपाचा प्रश्ना लवकर सोडवला जाईल याचे आश्वा सन वाहतुकदारांना दिले आहे.

> पालिका क्षेत्रामध्ये पेट्रोल पंप वाढवण्याच्या पनवेल पालिकेच्या धोरणाप्रमाणे, लोखंड पोलाद बाजार समितीनेही पेट्रोल पंपा साठी जागा आरक्षित जागेवर ती तात्काळ पेट्रोल पंप सुरू करावा. जेणेकरून वाहनचालकांच्या वेळेची व इंधनाची बचत होईल व त्यांची गैरसोय टळेल
>
> **रामदास शेवाळे, शिवसेना महानगरप्रमुख व माथाडी व वाहतुकदार नेते कळंबोली**

# राजेंद्र भोरावकर आणि हरिशचंद्र कोळी आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड प्रेस क्लबच्या माध्यमातुन जिल्ह्यातील प्रगत आणि शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचा सन्मान त्यांच्याच शेताच्या बांधावर जाऊन दरवर्षी केला जातो रायगड प्रेस क्लब तळा शाखेच्या वतीने आदर्श शेतकरी पुरस्कार राजेंद भोरावकर (रा. खांबवली) आणि हरिशचंद्र कोळी (रा.शेनाटे आदिवासी वाडी) यांना खांबवली येथे शेताच्या बांधावर पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी या सन्मान सोहळ्यास शेणवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष खेळु वाजे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व्ही.व्ही.यादव, स्वदेश फांऊडेशनचे मॅनेजर चव्हाण, तळा प्रेस क्लबचे अध्यक्ष संजय रिकामे, उपाध्यक्ष किशोर पितळे, सचिव संध्या पिंगळे, पत्रकार पुरुषोत्तम मुळे, कृष्णा भोसले, श्रीकांत नांदगावकर, शेणवली ग्रामपंचायत सरपंच निकीता गायकवाड, सत्कारमुर्ती राजेंद्र भोरावकर, हरिशचंद्र कोळी, कृषी अधिकारी काणेकर, कृषी सहाय्यक म्हात्रे, बळीराजा शेतकरी संघटनेचे तळा तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर भोईर, भास्कर गोळे, शेतकरी सामाजिक संघटनेचे पदाधिकारी,



पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष खेळुवाजे यांनी सांगीतले की रायगड प्रेस क्लब ही पत्रकारांची शिखर संस्था असुन रायगड जिल्ह्यातील पत्रकारांच्या समस्या मार्गी लावण्या बरोबरच जिल्ह्यातील सामाजिक प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीकोनातुन महत्वाचे काम करत आहे. संघटनेने महामार्ग रुंदीकरणासाठी केलेल्या आंदोलनाची दखल शासनाला घ्यावी लागली. सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करत असतानाच शेतीमध्ये शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्याच्या हेतुनेच आदर्श शेतकरी पुरस्कार हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. यावर्षी राजेंद्र भोरावकर आणि हरिशचंद्र कोळी हे यापुरस्काराचे मानकरी ठरले असुन त्यांचे अभिनंदन त्यांनी यावेळी केले. व हा सन्मान पत्रकारांकडुन केला जात असल्याने त्यांचा देखील अभिमान वाटत असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. गटविकास अधिकारी व्ही.व्ही यादव यांनी रायगड प्रेस क्लब तर्फे दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या या आदर्श शेतकरी पुरस्काराचे कौतुक करुन खरोखरच तळा तालुक्यातील पत्रकार योग्य शेतकऱ्याची निवड करुन त्यांचा सन्मान करत असल्याचे सांगीतले. या दोन्ही शेतकऱ्यांचा आदर्श घेऊन ईतर शेतकऱ्यांनी शेती आणि शेती पुरक व्यवसाय करण्याचे आवाहन केले. शेती बाबत शासनाच्या विविध योजना असुन त्याचा विनीयोग आपण घ्यावा त्यासाठी लागणारी मदत शासनातर्फे केली जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले. केवळ भात शेतीवर लक्ष केंद्रित न करता ज्या उत्पादनाने आर्थिक लाभ होईल त्या पिकांची लागवड शेतकऱ्यांनी केली पाहीजे असे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. पंचायत समिती कृषी अधिकारी काणेकर यांनी शासनाच्या विविध योजनांची माहीती दिली तर तालुका कृषी पर्यवेक्षक म्हात्रे यांनी तालुक्यात सुरु असलेले विविध उपक्रम आणि आधुनिक शेती कशी केली जाते याची माहीती पुरवली. पुरस्कार मिळालेल्या शेतकऱ्यांची प्रेरणा घेऊन ईतर शेतकरी देखील आता जोमाने काम करुन पुढील वर्षी रायगड प्रेस क्लबचा आदर्श शेतकरी पुरस्कार मला कसा मिळेल यासाठी प्रयत्न करेल असे मत सर्व मान्यवरांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तळा प्रेस क्लबचे अध्यक्ष संजय रिकामे यांनी केले, प्रास्ताविक पत्रकार पुरुषोत्तम मुळे यांनी केले तर आभार संजय रिकामे यांनी मानले.

# आजाद समाज पार्टीच्या पनवेल तालुका अध्यक्षपदी रूपाली शिंदे यांची नियुक्ती



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज पनवेल तालुक्यातील सावित्रीची लेक, क्रांतीज्योत महिला विकास फाऊंडेशन व पनवेल वार्ता वेब न्यूज चॅनेल ची संपादीका, समाजसेविका, सौ.रूपालीताई शिंदे यांची आजाद समाज पार्टी पनवेल तालुकाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली.

तसेच सौ.विद्याताई जाधव यांची पनवेल प्रभाग क्रमांक १८ साईनगर विभागप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली. रूपालीताई शिंदे व विद्याताई जाधव यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा. या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा मा. सौ.नेहाताई शिंदे, महाराष्ट्र कोषाध्यक्षा/ रायगड जिल्हा प्रभारी राजश्रीताई अहिरे, रायगड जिल्हा संघटक जयश्रीताई पाटील, कळंबोली शहर उपाध्यक्षा संगिताताई कांबळे सह क्रांतीज्योत महिला विकास फाउंडेशन च्या खजिनदार सौ.किरण अडागळे, विचुंबे विभागीय अध्यक्ष सौ.रत्नमाला पाबरेकर, सदस्या श्रीमती स्नेहा धुमाळ, प्रतीक्षा सह कार्यकर्त्या सहकारी उपस्थित होत्या.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## अनिल देशमुख यांची ४ कोटींची मालमत्ता जप्त

अनिल देशमुख हे गृहमंत्री असताना या फ्लॅटचा विक्री व्यवहार करण्यात आला, असे ईडीच्या तपासात आढळले आहे. अनिल देशमुख गृहमंत्री असताना त्यांनी सचिन वाझेच्या माध्यमातून ऑर्केस्ट्रा बार मालकांकडून ४.७० कोटी इतकी रक्कम लाच स्वरूपात मिळवल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याचा दावाही ईडीने केला आहे. दिल्ली स्थित डमी कंपन्यांच्या मदतीने देशमुख यांनी मनी लाँड्रिंगच्या माध्यमातून ४.१८ कोटी रुपये आपल्या ट्रस्टसाठी मिळवले. ही रक्कम श्री साई शिक्षण संस्थेच्या खात्यात दाखवण्यात आली, असा दावाही ईडीकडून करण्यात आला आहे.

देशमुख कुटुंबीयांकडे प्रीमियर पोर्ट लिंक्स कंपनीची ५० टक्के मालकी आहे. या कंपनीच्या नावे जमीन, दुकाने अशी मिळून ५.३४ कोटी रुपयांची मालमत्ता आहे. या कंपनीची मालकी देशमुख कुटुंबाने केवळ १७.९५ लाख रुपयांच्या बदल्यात मिळवल्याचा दावाही ईडीकडून करण्यात आला आहे.

## शाळा नाही अन् शिक्षण ही नाही तरीही महापालिका वसूल करते शिक्षण शुल्क

आहेत. मात्र कळंबोली कामोठा, खारघर, तळोजा व उर्वरित भागात पनवेल महापालिकेच्या शाळा महापालिका अस्तित्वात झाल्यापासून कार्यरतच नाहीत. तरीही या वसाहतींमधील नागरिकांवर शिक्षण शुल्काची धाड मात्र चांगलीच टाकली आहे. पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी मार्च २१ पर्यंत सिडकोला ही सेवा कर दिला आहे. अद्याप पर्यंत सिडकोच नागरिकांना विविध नागरी सुविधा पुरवीत होती अगदी कमी रकमेमध्ये सिडको चांगल्या सुविधा देत असताना महापालिकेला एवढा मोठा कर करण्याची का गरज भासली असा नाराजीचा सूर आता नागरिकांमध्ये उमटत आहे त्यामुळे जर सिडकोला कमी रकमेत सेवा द्यायला जमत होतं तर महापालिकेला का नाही जमत. त्यामुळे आमची सिडकोच बरी होती, महापालिका करण्याची घाई का केली असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत. महापालिका अस्तित्वात झाल्यानंतर कळंबोली, कामोठा, खारघर, तळोजा भागातील नागरिकांना शिक्षणासाठी महापालिकेने शाळाही निर्माण केल्या नाही. तरीही नागरिकांवर शिक्षण शुल्क का लादले गेले आहे. ज्या भागात महापालिकेच्या शाळा नाहीत त्या भागातील रहिवाशांचे वरील शिक्षण शुल्क रद्द करून दिलासा देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते रमेश तुकाराम बगाडे यांनी केली आहे.

## संभाव्य तिसऱ्या लाटेत उद्योगक्षेत्र सुरळित सुरु राहील याचे काटेकोर नियोजन करा

आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

आपण कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेचा समर्थपणे मुकाबला केला. अजून दुसरी लाट ओसरली नाही तोपर्यंत तिसऱ्या लाटेची शक्यता वर्तवली जात आहे. राज्यात दुसऱ्या लाटेत रुग्णसंख्या कमी झाली असली तरी ती अजूनही साडे आठ हजार ते ९ हजारावर स्थिरावली आहे, अजूनही ती त्या खाली जातांना दिसत नाही, उलट काही जिल्ह्यात रुग्णसंख्या पुन्हा वाढतांना दिसत आहे ही चिंतेची बाब असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, दुसऱ्या आणि तिसऱ्या लाटेतील आपल्याला हा जो मधला काळ मिळाला आहे त्यात तिसरी लाट येऊच नये यासाठी किंवा दुर्देवाने आलीच तर त्याची तीव्रता कमी राहील यासाठी अधिक मेहनत घेण्याची गरज आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्यात कोरोना आरटीपीसीआर चाचण्या वाढवा, पर्यटनस्थळी होणारी गर्दी तातडीने थांबवा, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.

कुठल्याही परिस्थितीत सार्वजनिक ठिकाणी गर्दी होऊ देऊ नका, रस्त्यावर फिरणारे नागरिक मास्क घालूनच फिरतील याची दक्षता घ्या, ज्या ठिकाणी रुग्णसंख्या वाढत आहे त्या क्षेत्राला कंटेंमेंट झोन जाहीर करून त्यात कोरोना प्रतिबंधक नियमांचे कडक पालन करा, गाव, वाड्या वस्तींवर लक्ष केंद्रीत करा, कोरोनामुक्त गाव संकल्पनेत चांगले काम होईल यादृष्टीने प्रयत्न करा, कोरोना विषाणुमध्ये बदल दिसत असेल तर जिनोम सिकवेन्सी करून घ्या अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. राज्याने एका दिवसात आठ लाख लोकांचे लसीकरण करून उच्चांक स्थापन केला असला तरी लस उपलब्धतेला मर्यादा आहे त्यामुळे लसीकरणास विलंब होत आहे, काही नागरिकांना तर अजून पहिला डोसही मिळाला नाही अशा स्थितीत वाढती रुग्णसंख्या, डेल्टा विषाणूचा उद्भव आणि तिसरी लाट धोक्याची ठरू शकते हे लक्षात घ्या, आतापर्यंत घेतलेल्या मेहनतीवर पाणी पडू देऊ नका असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले तसेच शासन या सर्व कामासाठी आपल्या सर्वांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी दिली. त्यांनी ऑक्सिजन निर्मितीसाठी तसेच उद्योग सुरळित सुरु राहावेत यासाठी उद्योजक करत असलेल्या सहकार्यासाठी आभार देखील मानले.

# अनुसूचित जमातीच्या कुटुंबाना ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते अन्नधान्य वस्तूचे किट वाटप



**दै.रायगड नगरी । मुरुड**

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित नाशिक, प्रादेशिक कार्यालय जव्हार व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय पेण यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जमातीच्या मुरुड तालुक्यातील ११६३ आदिवासी कुटुंबाना सहाय्य करणेसाठी खावटी अनुदान योजने अंतर्गत अन्नधान्य वस्तूचे किट राज्यमंत्री तथा पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते प्रातिनिधिक तत्वावर दहा आदिवासी कुटुंबाना देण्यात आले. यामध्ये दोन हजार रुपये बँक खात्यात जमा होणार व रुपये २००० किमतीचा अन्नधान्याचा किट देण्यात येणार असल्याचे तसेच संपुर्ण रायगड जिल्ह्यात ४८५६५ किट चे वाटप करण्यात येणार असल्याचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी एस एम शेरमकर यांनी सांगितले, याप्रसंगी पंचायत समिती सभापती आशिका ठाकूर, उपसभापती चंद्रकांत मोहिते, नगराध्यक्षा स्नेहा पाटील, मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मंगेश दांडेकर, अतिक खतीब, जिल्हा परिषद सदस्य नम्रता कासार, सहाय्यक प्रकल्प अधिकारी सोळसकर, आर बी पवार इत्यादी उपस्थित होते. आदिवासी समाजाचे नेते भगवान नाईक यांनी समाजाच्या विविध व्यथा मांडल्या. सदर कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना राज्यमंत्री तथा पालकमंत्री अदिती तटकरे यांनी अधिकाऱ्यांना सांगितले की जिल्ह्यातील जे लाभार्थी ज्याच्याकडे आधारकार्ड सारखे आवश्यक कागदपत्रे नसली तरी त्याची पूर्तता करून घ्या त्यांना या योजनेपासून वंचित ठेवू नका, तसेच स्थलांतरित आदिवासी कुटुंबांचा शोध घेऊन त्यांनाही या योजनेचा लाभ होईल. या दृष्टीने प्रयत्न करा, तसेच किनाऱ्यावर थर्माकोलच्या बोटी बनवून मासेमारी करणाऱ्या आदिवासी कुटुंबाना प्रत्येकी तीन लाख किमतीच्या प्रथम ६० बोटींच्या प्रस्ताव दाखल झाला आहे त्या संदर्भात संबंधित खात्याकडून पाठपुरावा करून लाभार्थींना लाभ मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

# सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान तर्फे नागोठण्यातील वीज कर्मचाऱ्यांना रेनकोट व हँडग्लोजचे वाटप

**दै.रायगड नगरी । वाकण**

विजवितरण कंपनीच्या नागोठणे कार्यालयातील वीज कर्मचाऱ्यांना सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे रेनकोटचे वाटप शुक्रवारी (दि. १६) करण्यात आले. हे रेनकोट व हँडग्लोज विजवितरणचे नागोठण्यातील सहाय्यक अभियंता वैभव गायकवाड व मुख्य वीज तंत्रज्ञ विजय पवार यांच्या कडे सुपूर्त करण्यात आले.

रायगड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार सुनील तटकरे यांच्या ६६ व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती ताई तटकरे व आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच त्यांच्याच संकल्पनेतुन श्री. सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या सयुक्त विद्यमानाने रायगड जिल्ह्यातील मुसळधार पावसाची परीस्थिती पाहता त्याच बरोबर अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये उद्धवणाऱ्या समस्यांसोबत लढत असणा-या वीज कर्मचाऱ्यांसाठी हा कार्यक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व राष्ट्रवादीचे स्थानिक नेते विलास चौलकर, रोहा तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष जयवंत मुंडे, रायगड जिल्हा युवक सचिव विनायक गोळे, नागोठणे ग्रामपंचायत सदस्य अकलाख पानसरे, अतुल काळे, पाटणसई ग्रा.पं. सदस्य सचिन कळसकर, वांगणी ग्रा.पं. सदस्य प्रमोद जांबेकर, विभागीय यवक अध्यक्ष निवास पवार, अमित जांबेकर, रोहिदास हातनोलकर, दीपेंद्र आवाद, श्रीकांत रावकर, प्रथमेश काळे, दिनेश घाग, मनोज टके, अक्षय नागोठणेकर, हरेश कोकरे आदींसह राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## अल्पवयीन मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका १५ वर्षीय ७ महिने अल्पवयीन मुलीचे अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेल्याची घटना पनवेल तालुक्यातील करंजाडे गाव परिसरात घडली आहे.

या ठिकाणी राहणारी १५ वर्षीय ७ महिने रंग गोरा, उंची अंदाजे साडेचार फूट, केस वाढलेले, एक वेणी, चेहरा गोल, डोळे काळे, नाक सरळ असून अंगात निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट व पिवळ्या रंगाचा कुतडा तसेच पायात काळ्या रंगाचे बुट, कानात साधी कुडी, नाकात साधी चमकी घातलेली आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

## पनवेल शहरातून रिक्षाची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील शिवाजी नगर झोपडपट्टीसमोर उभी करून ठेवलेली ५० हजार रुपये किंमतीच्या रिक्षाची चोरी केल्याची घटना घडली आहे.

नरेंद्र चौधरी यांनी त्यांची एमएच-४६-एझेड-७९२६ काळ्या पिवळ्या रंगाची बजाज ऑटो रिक्षा ही शिवाजी नगर झोपडपट्टी समोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर रिक्षाची चोरी केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## विद्यार्थ्यांना सॅनेटायझर व ऑक्सिमीटरचे वाटप

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या संस्थेचे श्रमिक विद्यालय चिल्हे या विद्यालयास ऑक्सिमिटर व विद्यार्थी वर्गाला सॅनेटायझर वाटपाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला.

देवकान्हे ग्रा. पंचायतीचे सरपंच तथा रायगड जिल्ह्याचे लोकशाहीर रायगड भूषण वसंत भोईर, ग्रा. पं.सदस्य दयाराम भोईर तसेच युवा कार्यकर्ते मंगेश ठाकूर यांच्या वतीने सदर ऑक्सिमिटर व सॅनेटायझरचे वाटप करण्यात आले आहे. यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप, सहा. शिक्षक नरेंद्र माळी, आर.के.म्हात्रे, महेंद्र जवरत, संजय आंधळे, अमोगसिद्ध सुरवसे, अनुराधा मोरे, ज्योत्स्ना सबरदंडे, रामदास नवघरे, चंद्रशेखर कांबळे, रेश्मा शिंदे आदी उपस्थित होते. सध्या जगभर कोरोना महामारीचे थैमान सुरू असून कोरोना काळात विद्यार्थी वर्गाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर वस्तूंचे वाटप करण्यात आले असल्याचे सांगतानाच विद्यार्थी वर्गाने आयुष्यात खुप शिक्षण घेऊन मोठे होऊन स्वतः बरोबरच आई-वडील व समाजाचे नावलौकिक करावे अशाप्रकारचे मार्गदर्शन यावेळी सरपंच तथा लोकशाहिर वसंत भोईर यांनी विद्यार्थी वर्गाला केले.

## ३२ वर्षीय महिला बेपत्ता


**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोणाला काहीही न सांगता पडघे- कोळवाडी येथील ३२ वर्षे महिला राहत्या घरातून निघून गेली आहे. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सविता प्रबल दास असे या महिलेचे नाव असून तिची उंची पाच फूट, रंग सावळा, केस काळे व लांब आहेत. तिने नाकात नथ, कानात सोन्याची बाळी, गळ्यात मंगळसूत्र घातले आहे. तिच्या अंगात लाल रंगाचा कुर्ता आणि काळ्या रंगाचे लेडीज आहे. तिला हिंदी आणि मराठी भाषा बोलता येते.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## मुरुड तालुक्यातील पुरग्रस्तांना आ.महेंद्र दळवी यांच्याकडून मदतीचा हात



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्याला गेले काही दिवस पावसाने चांगलेच झोडपले असून बऱ्याचश्या गावांमध्ये पुरस्थिती निर्माण होऊन घरात पाणी शिरल्याने नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

त्यातच नांदगाव मधील खारीकवाडा, उसरोली, आदाड, मजगाव परीसरातही खूप नुकसान झाले आहे. नुकताच अलिबाग मतदारसंघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी या भागाला भेट देऊन नुकसानीचा आढावा घेतला. व बुधवारी तातडीची मदत म्हणून या भागातील नागरिकांना अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी पंचायत समितीचे उपाध्यक्ष चंद्रकांत मोहिते, सौ राजश्री मिसाळ, हर्षल घरत, कुबल व स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. जोपर्यत पूरग्रस्त परिस्थिती पूर्ववत होत नाही तोपर्यंत ही मदत सुरुच राहील असे आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी सांगितले. तसेच नांदगांव येथील मोरया ग्रुप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक यांनीही खारीकवाडा येथील पूरग्रस्तांना अन्नदानाची मदत केली. सध्या येथील पूरग्रस्त नागरिक आर्थिक संकटात असून या मिळालेल्या मदतीमुळे त्यांनी दात्यांचे आभार मानले.

# ३ कोटीचे कर्ज देण्याच्या बहाण्याने ७ लाख रुपये उकळणाऱ्या भामट्याचा पोलिसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

३ कोटी रुपयांचे कर्ज देण्याच्या बहाण्याने एका भामट्याने सीबीडीत राहणाऱ्या एका व्यावसायिकाकडून ७ लाख रुपये उकळून त्यांना कुठल्याही प्रकारचे कर्ज न देता त्यांची फसवणुक केल्याची घटना उघडकिस आली आहे. विशेष म्हणजे या भामट्याने सदर व्यवसायीकाला बनावट व खोटे बँक स्टेटमेंट दाखवून त्यांच्याकडून सदरची रक्कम उकळल्याचे उघडकीस आले आहे. सीबीडी पोलिसांनी या भामट्या विरोधात फसवणुकीसह बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार दिपक अनाजे (४२) हे सीबीडी बेलापुर येथील आग्रोळी गावात राहण्यास असून त्यांचा अलिबाग येथे कोळंबी पालनाचा प्रकल्प आहे. याच व्यवसायासाठी त्यांना भांडवलाची गरज होती. त्यामुळे वर्षभरापुर्वी अनाजे एका चांगल्या फायनान्सरच्या शोधात होते. त्यावेळी त्यांना संदिप अनंत धनावडे हा भांडवल मिळवुन देत असल्याची माहिती मिळाल्याने अनाजे यांनी त्याची भेट घेतली होती. तसेच त्यांना १ कोटी रुपयांची आवश्यकता असल्याचे सांगितले होते. मात्र त्यावेळी संदिप धनावडे याने त्याच्याकडून किमान ३ कोटी रुपये घ्यावे लागतील तसेच घेतलेल्या भांडवलावर महिन्याला १ टक्का व्याज द्यावे लागेल असे सांगितले होते. दिपक अनाजे यांना भांडवलाची गरज असल्याने त्यांनी ३ कोटीवर महिना एक टक्का व्याज देण्याची तयारी दर्शविल्यानंतर संदिप धनावडे याने दिपक अनाजे यांच्यासोबत करारनामा देखील करुन घेतला. त्यानंतर धनावडे याने ७ डिसेंबर २०२० रोजी दिपक अनाजे यांना फोन करुन त्यांना देण्यात येणारी ३ कोटीची रोख रक्कम पुण्यातील हिंजवडी येथून बेलापुर येथे आणण्यासाठी पुण्यातील कंपनीच्या अधिकाऱ्यांना ४ लाख रुपये कमिशन द्यावे लागतील असे सांगितले. त्यामुळे दिपक अनाजे यांनी त्याच्यावर विश्वा स ठेवून ४ लाख रुपये त्याने दिलेल्या बँक खात्यात पाठवुन दिले.

मात्र त्यानंतर ३ कोटीची रक्कम न मिळाल्याने दिपक अनाजे यांनी धनावडे याला संपर्क साधला. यावर त्याने पुण्यातील कंपनीत तांत्रिक अडचण झाल्याचे व त्यांचे पैसे दहा ते पंधरा दिवसात मिळतील असे सांगितले. त्यानंतर देखील त्याने अनाजे यांना पैसे दिले नाही. उलट त्याने त्याच्या बँक खात्यात भरपुर पैसे असल्याचे व इन्कम टॅक्स विभागाने त्याचे दोन्ही बँक खाते गोठविल्यामुळे त्याला पैसे काढता येत नसल्याचे कारण सांगत, पुण्यातील कंपनीला आणखी ३ लाख रुपये कमिशन पाठवुन देण्यास सांगितले. त्यासाठी भामट्या धनावडे याने त्याच्या दोन्ही बँकेचे बनावट स्टेटमेंट दिपक अनाजे यांच्या व्हॉटसऍपवर पाठवून दिले. धनावडे याने पाठविलेल्या बनावट बँक स्टेटमेंटमधील एका खात्यात ३३ कोटी तर दुसऱ्याम खात्यात ८ कोटी रुपये असल्याचे निदर्शनास आल्याने अनाजे यांचा धनावडेवर विश्वॉस बसला. त्यामुळे त्यांनी आणखी ३ लाख रुपये पाठवून दिले. त्यानंतर दिपक अनाजे यांनी धनावडेकडे वारंवार कर्ज रक्कमेची मागणी केली. मात्र त्याने वेगवेगळी कारणे सांगून टाळाटाळ केली. त्यामुळे दिपक अनाजे यांनी धनावडे याने पाठविलेल्या बँक स्टेटमेंटची बँकेकडून पडताळणी केली असता, ती बनावट व खोटे असल्याचे आढळून आले. यावरून संदिप धनावडे याने फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर दिपक अनाजे यांनी सीबीडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# चिरनेर येथील कोविड लसीकरणाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यातील कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने चिरनेर प्राथमिक शाळेत काल घेण्यात आलेल्या कोविड - १९ च्या लसीकरणाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.राज्यात कोरोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेतील प्रादुर्भाव आटोक्यात येत असतांना आणखी ऑक्टोबर ते नोव्हेंबर २०२१ तिसऱ्या कोरोना लाटेची शक्यता वर्तविण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर खेडोपाड्यातील नागरिक आत्ता स्वतःच्या जीवाच्या अधिक काळजीपोटी आरोग्य विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या लसीकरणाला दाद देऊन लसीकरण करून घेणे पसंद करीत आहेत.

कोरोनाच्या या महामारीत उरण तालुक्यात आरोग्य यंत्रणेचे अधिकारी लसीकरणाच्या ठिकाणी परिस्थितीच्या पाहणीसाठी दाखल होत आहेत. पुढच्या काळासाठी कोरोना लसीकरण अत्यंत महत्वाचे असल्याने तालुक्यातील जेएनपीटी टाऊनशिप,कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्र व इंदिरा गांधी रुग्णालयाच्या वतीने कार्यरत असलेल्या नानासाहेब धर्माधिकारी प्राथमिक शाळा उरण या लसीकरण केंद्रांवर दररोज नागरिकांची कोरोना लसीकरणासाठी गर्दी होत आहे.

त्यामुळे आत्ता कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाराम भोसले यांनी गावोगावच्या नागरिकांना अधिक प्रधान्य देण्याच्या हेतून काल चिरनेर येथील प्राथमिक शाळेत कोरोना लसीकरणाच्या मोहिमेचे आयोजन करून कोविडशिल्डचे पाहिला - १०० व दुसरा - १०० अशा एकूण - २०० डोस १८ ते ४४ त्याच प्रमाणे ४५ च्या वरील बहुतांशी जेष्ठ नागरिक व महिलांना देण्यात आले.डोस घेणाऱ्या सर्वच नागरिकांची सुरुवातीला आरोग्य सेविकांच्या वतीने कोरोना तपासणी करण्यात आली.

यावेळी आरोग्य यंत्रणेसह चिरनेर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच प्रियांका गोंधळी,ग्रामपंचायत सदस्य किरण कुंभार,राजेंद्र भगत,सचिन घबाडी,पप्पू मुंबईकर यांच्यासह गावातील तरुण कार्यकर्त्यांनी लसीकरणाचा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अधिक मेहेनत घेतली.

# पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-

शनिवार दि.१७ जुलै २०२१ रोजी सकाळी ११.०० वा. मुंबई येथून शासकीय वाहनाने खालापूरकडे प्रयाण. दुपारी १२.३० वा. खालापूर येथे आगमन व आदिवासी उपयोजनांतर्गत खावटी अनुदान किट वाटप कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : तहसिल कार्यालय, खालापूर. दुपारी १.०० वा. खालापूर येथून शासकीय वाहनाने मौजे अंजरुण ता.खालापूरकडे प्रयाण. दुपारी १.१५ वा. मौजे अंजरुण येथे आगमन व श्री.शेखर पिंगळे यांच्या निवासस्थानी राखीव. दुपारी २.०० मौजे अंजरुण ता.खालापूर येथून शासकीय वाहनाने मौजे पिंगळस ता.कर्जतकडे प्रयाण. दुपारी २.३० वा. मौजे पिंगळस येथे आगमन आदिवासी उपयोजनांतर्गत खावटी अनुदान किट वाटप कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : शासकीय आश्रमशाळा पिंगळस ता.कर्जत. दुपारी ३.०० वा. पिंगळस येथील प्रस्तावित शासकीय मुलींचे वसतिगृहाची पाहणी. दुपारी ३.३० मौजे पिंगळस येथून शासकीय वाहनाने सुधागड कडे प्रयाण. सायं.५.०० वा. सुधागड येथे आगमन व आदिवासी उपयोजनांतर्गत खावटी अनुदान किट वाटप कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ : तहसिल कार्यालय, सुधागड-पाली. त्यानंतर सुधागड येथून शासकीय वाहनाने सुतारवाडी ता.रोहाकडे प्रयाण. सुतारवाडी येथे आगमन व राखीव.

ॲड.सुधीर एस. म्हात्रे
ॲड.कल्याणी एस. पाटील-म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.७१९/२०२१
ने.ता.२०/०८/२१

श्रीमती.दिपीका अशोक पारंगे
लग्नानंतरचे नाव सौ.दिपीका सागर म्हसकर
वय : ३० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
राहणार : ए/१२ दुर्गाकृपा हौसिंग सोसायटी,
सावरकर चौक, मारुती मंदिराच्या जवळ,
लोखंडीपाडा, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
पनवेल विभाग ... सामनेवाला

या तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.सुचिता अशोक पारंगे हिचा मृत्यू ए/१२ दुर्गाकृपा हौसिंग सोसायटी, सावरकर चौक, मारुती मंदिराच्या जवळ, लोखंडीपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.२०/०७/२०१९ रोजी झालेला आहे. परंतु सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयात अनावधानाने करावयाची राहून गेली आहे आणि अर्जदार यांची आई कै.सुचिता अशोक पारंगे हिच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.सौ.सुचिता अशोक पारंगे वर नमूद ठिकाणी मयत झालेले आहेत किंवा कसे याबद्दल कोणासही काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाचीही हरकत असेल, तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याचे आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून, त्यांस सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२१/०६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, सदरहू मिळकत १) रफिक आदमजी शेख २) रशिदा इस्माईल शेख ३) मोहम्मद अमिन इब्राहीम शेख ४) तसलीमा इब्राहीम शेख ५) असलम इब्राहीम शेख ६) नसिमा शब्बीर शेख ७) नाजिया अब्दुलमजीद शेख ८) रियान जावेद शेख ९) आसमा गुलाम रसुल शेख यांचे मालकीची, वहिवाटीची व ताबेकब्जातील, शेतजमीन मिळकत मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ९६ | १ अ | ०-६०-०० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-६१-५० (यापैकी ०-४४-० हे.आर.पॉ. खरेदीखताचा विषय आहे.) | १२.०० |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

मौजे : निताळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वरील मिळकत आमचे अशिल यांनी कायम फरोक्त खताने विकत घ्यावयाची ठरविली आहे. सदरहू मिळकत ही १) रफिक आदमजी शेख २) रशिदा इस्माईल शेख ३) मोहम्मद अमिन इब्राहीम शेख ४) तसलीमा इब्राहीम शेख ५) असलम इब्राहीम शेख ६) नसिमा शब्बीर शेख ७) नाजिया अब्दुलमजीद शेख ८) रियान जावेद शेख ९) आसमा गुलाम रसुल शेख यांचे मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील असून महसूल दप्तरी सातबारा सदरी त्यांची नावे लागलेली आहेत. वरील सदरहू मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आपला हक्क व हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहीत धरण्यात येईल. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.


दि.१६/०७/२०२१

**सही/-**
**ॲड.दिनेश दत्तात्रेय पाटील**
**जय नारायण बिल्डींग, गाळा नं.४,**
**गावदेवी मंदिरासमोर, राम गणेश गडकरी मार्ग, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८७९८९७०६९**

# पोलादपूर तालुक्यात कोरोनाबळींचे अर्धशतक

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील कोरोना संसर्गित रूग्णांचा दर कमी होऊन लसीकरणाचा वेग वाढत असताना कोरोनाबळींचे देखील अर्धशतक पुर्ण झाल्याची आकडेवारी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.गुलाबराव सोनावणे यांनी दिली.



तालुक्यात कोरोना संसर्गाचा प्रादूर्भाव नियंत्रणात येऊनही मृत्यूदर अधिक वाढत असल्याचे दिसून येत आहे. गुरूवारी दिवसभरात ३ कोरोना रूग्णांची नोंद झाली असून पोलादपूर भैरवनाथनगर येथील एक वृध्द रूग्ण विठ्ठल म्हस्के डेरवण जि.रत्नागिरी येथे उपचारादरम्यान दगावल्याने आतापर्यंत तालुक्यात कोरोनाबळींची संख्या ५० झाल्याची माहिती तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ.गुलाबराव सोनावणे यांनी दिली. सुमारे ११५६ कोरोना रूग्णांपैकी १०८२ रूग्णांवर उपचार करून घरी सोडण्यात आले असून २४ रूग्ण कोरोना बाधित असल्याचे दिसून आले आहे. यापैकी १८ जणांवर घरामध्ये उपचार सुरू असून ४ जणांवर महाड कोविड केअर सेंटरमध्ये तर २ जणांवर जिल्हा रूग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत, अशी माहिती यावेळी डॉ. सोनावणे यांनी दिली.

मे.मुजावर साहेब यांचे कोर्ट
ॲड.प्रदीप तु. मुंडकर
अर्जदार तर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.४९८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०८/२१

१) श्री.प्रकाश केशव पाटील
वय वर्षे ५९, धंदा : व्यवसाय
२) श्री.श्रीधर केशव पाटील
वय वर्षे ५६, धंदा : नोकरी
३) श्री.संजय केशव पाटील
वय वर्षे ५४, धंदा : नोकरी
४) श्री.प्रल्हाद केशव पाटील
वय वर्षे ५२, धंदा : नोकरी
अ.क्रं.१ ते ४ सर्व रा.डुंगी,
गावदेवी मंदिर जवळ, पो.पारगांव,
ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.दमयंती दत्तात्रेय बंडा
वय वर्षे ६५, धंदा : घरकाम
रा.नवघर (जेएनपीटी), ता.उरण, जि.रायगड
६) श्रीमती.सरस्वती नामदेव पाटील
वय वर्षे ६१, धंदा : घरकाम
रा.जासई, घर नं.५२७, दास्तान फाटा जवळ,
उरण-पनवेल रोड, ता.उरण, जि.रायगड
७) श्रीमती.कल्पना विलास पाटील
वय वर्षे ४६, धंदा : घरकाम
रा.जुई-कामोठे, कराडी समाज मंदिर जवळ,
ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार

१) अर्जदार क्रं.१ ते ४ हे मयत कै.केशव सिताराम पाटील यांचे मुलगे असून अर्जदार क्रं.५ ते ७ ह्या मुली आहेत.

२) कै.केशव सिताराम पाटील हे दि.७/१२/२०२० रोजी मु.पारगांव डुंगी, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत. तसेच कै.केशव सिताराम पाटील यांची पत्नी कै.रामुबाई केशव पाटील यांचा दि.२७/१२/२०१८ रोजी मृत्यू झालेला आहे. तसेच आई कै.देहूबाई उर्फ देवकूबाई सिताराम पाटील यांचा दि.२२/०४/१९८१ रोजी मृत्यू झालेला आहे. मयत कै.केशव सिताराम पाटील यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. या अर्जदारांव्यतिरिक्त यांस आणखीन कोणीही वारसदार नव्हते व नाहीत.

३) कै.केशव सिताराम पाटील यांचे नावे असलेली खालील कोष्टक (अ) मधील वर्णनाची शेतजमीन मिळकत ही शासनाने सिडको नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादीत केलेली आहे.

**कोष्टक (अ) मौजे : पारगांव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | यु.केस नं. |
|---|---|---|---|---|
| पारगांव डुंगी | ८ | २ | ०-३९-५ | १९४ |
| | ३६ | १० | ०-१७-७ | |
| | ३८ | १२ | ०-७८-६ | |
| | ३९ | १ | ०-६७-९ | |
| | ४२ | ९ | ०-०१-७ | |
| | ४२ | १७ | ०-१३-८ | |
| | ४४ | १३ | ०-०२-० | |

वरील कोष्टक (अ) मध्ये नमूद संपादीत शेतजमिनीच्या बाबत नुकसान भरपाई म्हणून सिडको पुष्पकनगर दापोली, ता.पनवेल येथील भूखंड क्रं.४, सेक्टर क्रं.४, भूखंड क्षेत्र ३४९० (चौ.मी.) हे कै.केशव सिताराम पाटील यांचे नावे मंजूर करण्यात आलेले आहेत.

तसेच कै.केशव सिताराम पाटील यांचे नावे असलेली खालील कोष्टक (ब) मधील शेतजमीन मिळकत ही सातबारा सदरी (नवी मुंबई प्रकल्पासाठी भूसंपादनात समाविष्ट) अशी नोंद करण्यात आलेली आहे.

**कोष्टक (ब) मौजे : पारगांव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आ. (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| पारगांव डुंगी | ३७ | १९ | ०-०६-६ | १.०४ |

तसेच कै.केशव सिताराम पाटील व इतर, यांचे नावे असलेली खालील कोष्टक (क) मधील शेतजमीन मिळकत ही शासनाने सिडको नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी संपादीत केलेली आहे.

**कोष्टक (क) मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | यु.केस नं. |
|---|---|---|---|---|
| दापोली | १४९ | ५+६ | ०-१४-० | ५५ |

वरील कोष्टक (क) मध्ये नमूद संपादीत शेतजमिनीच्या मोबदल्यापोटी देय भूखंडाची पात्रता एकूण भूखंड क्षेत्र २३० (चौ.मी.) ही कै.केशव सिताराम पाटील व इतर यांचे नावे मंजूर करण्यात आलेले आहेत.

तसेच कै.केशव सिताराम पाटील व इतर यांचे नावे असलेली कोष्टक (ड) मधील शेतजमीन मिळकत ही सातबारा सदरी (नवी मुंबई प्रकल्पासाठी भूसंपादनात समाविष्ट) अशी नोंद करण्यात आलेली आहे.

**कोष्टक (ड) मौजे : दापोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आ. (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| दापोली | १६४ | २ | ०-१५-० | ३.०० |

तसेच कै.केशव सिताराम पाटील यांचे नावे ग्रामपंचायत पारगांव, ता.पनवेल येथील घर मिळकत क्रमांक ३३८ ही नमूद आहे.

४) वर कलम ३ मधील नमूद कै.केशव सिताराम पाटील यांचे नावे असलेली तसेच कै.केशव सिताराम पाटील व इतर यांचे नावे असलेली संपादीत शेतजमिनी बाबत सिडकोच्या २२.५ टक्के योजने नुसार कै.केशव सिताराम पाटील यांच्या हिश्याच्या भूखंडाचे लाभ व इतर मिळकतींचे फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांनी तसा वारसदाखला मिळण्याकरिता दिवाणी चौकशी अर्ज क्रं.४९८/२०२१ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमूद केलेल्या मिळकतींबाबत अर्जदार हे कै.केशव सिताराम पाटील यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे.न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १६/०७/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील शिरढोण पाडा येथील राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक विवाहिता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

सौ.संगीता बाळकृष्ण नाईक (३०) उंची ५ फूट २ इंच, रंग गोरा, चेहरा उभट, डाव्या हाताच्या पोटरीवर आतील बाजूस संगीता व बाळकृष्ण असे गोंदण आहे. नाक सरळ असून अंगात हिरव्या रंगाचा पंजाबी ड्रेस व चॉकलेटी रंगाची शाल तसेच पायात काळ्या रंगाची स्लिपर आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो.हवा. आर.आर.पागरे यांच्याशी संपर्क साधावा.

## ट्रेलरच्या धडकेत दोघे जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका ट्रेलरच्या धडकेने मोटार सायकलस्वार जखमी झाल्याची घटना तालुक्यातील जे.डब्ल्यू.आर च्या समोर बॉम्बे पाडा कडे जाणाऱ्या रस्त्यावर घडली आहे.

ट्रेलर चालक राजेशकुमार भारती हा त्याच्या ताब्यातील ट्रेलर घेवून भरधाव वेगाने बॉम्बे पाडा कडे जाणार्या रस्त्यावरुन जात असताना त्याने मोटार सायकलला दिलेल्या धडकेत मोटार सायकलवरील सिद्धार्थ मोरे (३५) व शितल मंडल हे दोघेही खाली पडून जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## भाजप म्हसळा तालुक्याच्या वतीने गरीब व गरजूंना अन्न धान्य किट वाटप

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोरोना प्रादुभावामुळे आज ही अनेक गरीब कुटुंब दैनदिन रोजगाराच्या संधी नसल्यामुळे त्रस्त आहेत हे लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टी कोकण विकास आघाडीच्या सहकार्याने भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य दक्षिण रायगड श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष कृष्णा कोबनाक यांच्या प्रयत्नाने श्रीवर्धन तालुक्यातील दिघी गावात व म्हसळा तालुक्यातील चाफेवाडी, रेवळी, घाणेरीकोड, चिरगाव, पेडांबे, आगरवाडा, गोंडघर, वारळ, देहेन, पाष्टी, खामगाव, चिखलप, खारगाव खुर्द, रोहिणी या गावामध्ये गरीब व गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप तालुका अध्यक्ष प्रकाश रायकर यांच्या नेतृत्वाखाली त्या विभागातील कार्यकर्ते यांच्या माध्यमातून करण्यात आला. यावेळी तालुका उपाध्यक्ष अनिल टिंगरे, तालुका उपाध्यक्ष समीर धनसे, तालुका चिटणीस मनोहर जाधव, प्रशांत महाडिक, योगेश महागावकर, परशुराम मुकणे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# नेरळ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी उषा पारधी यांची निवड

**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदावर आघाडीच्या उषा पारधी यांची बिनविरोध निवड झाली आहे त्यांनी बुधवारी शिवसेनेत प्रवेश केला होता भारतीय जनता पाटी शेतकरी कामगार पक्ष आणि आरपीआय आठवले गटाच्या माध्यमातून विकास आघाडी म्हणून सरपंच पदाचा फॉर्म त्यांनी भरला होता.



नेरळ ग्रामपंचायतीच्या २०१९ साली थेट सरपंच म्हणून विजय झालेले शिवसेनेचे रावजी शिंगवा यांचे आकस्मिक निधन झाले होते. त्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदाची निवडणूक गुरुवारी पीठासीन अधिकारी माणिक सानप यांच्या अध्यक्षतेखाली झाली अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या सरपंच पदासाठी बुधवारी शिवसेनेत प्रवेश केलेल्या प्रभाग क्रमांक एकमधून निवडून गेलेल्या उषा पारधी व प्रभाग दोनमधून निवडून गेलेल्या पार्वती पवार यांनी पक्षाचे जिल्हाप्रमुख यांनी १४ जुलै रोजी आदेश लेखी दिल्याने सरपंच पदासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र दुपारी दोन वाजता सरपंच पदाची निवड करण्यासाठी सभा सुरू होताच त्यांनी पक्षाच्या आदेशाने आपला अर्ज मागे घेतला त्यामुळे सरपंच पदाची निवडणूक बिनविरोध झाली.

विधानसभेची परतफेड कर्जत पंचायतीत बहुमत आसताना कर्जत पंचायत समिती उपसभापती शेतकरी कामगार पक्षाच्या आणि आता नेरळ ग्रामपंचायतील सरपंच पण शेतकरी कामगार पक्षाला परतफेड परतफेड केली असे बोलले जात आहे. विशेष सभेला राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन सदस्य गैरहजर होते. तर उषा पारधी, नितीन निर्गुडा, मंगेश म्हसकर, श्रद्धा कराळे, पार्वती पवार, धर्मानंद गायकवाड, शारदा साळेकर, शंकर घोडविंदे, जयश्री मानकामे, गीतांजली देशमुख, राजेंद्र लोभी, संतोष शिंगाडे, शिवाणी पोतदार, उमा खडे आणि प्रथमेश मोरे असे १५ सदस्य उपस्थित होते. सरपंच पदाच्या निवडणुकीचे महत्त्व लक्षात घेऊन कर्जत तहसील कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड हे प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उपस्थित होते. ग्रामविकास अधिकारी गणेश गायकर यांनी पीठासीन अधिकारी यांनी निवडणूक कामी सहकार्य केले.

# शिवसेनेत पक्षप्रवेश करणाऱ्याची गर्दी : नगरपरिषदेवर पुन्हा एकदा भगवा फडकणार : प्रसाद सावंत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी शिवसंपर्क अभियान सुरू केले आहे त्यास सर्वत्रच उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळत आहे. माथेरान या डोंगरमाथ्यावर सुध्दा शिवसेनेचे एकहाती वर्चस्व नगरपरिषदेत प्रस्थापित आहे. त्यामुळे आगामी काळात येणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत पुन्हा एकदा भगवा झेंडा फडकणार असा विश्वास गटनेते प्रसाद सावंत यांनी व्यक्त केला आहे.



शिवसंपर्क अभियान २४ जुलै पर्यंत राबविण्यात येणार असल्याने माथेरान मधील शिवसैनिकांनी प्रत्येक प्रभागात जाऊन युवा वर्गासह जेष्ठ नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन आपल्याकडे आकर्षीत करण्यात यशस्वी होत आहेत. संत रोहिदास नगर मधील विविध पक्षातील बहुतांश मंडळींनी स्वेच्छेने शिवसेनेचे सदस्यत्व पत्करत आहेत. तर महिला आघाडीच्या रणरागिणी सुद्धा आपापल्या पद्धतीने कार्यरत असून गावातील महिलांना शिव–सेनेत आणण्यासाठी पुढाकार घेत आहेत. मागील महिन्यात संत रोहिदास नगर येथील चर्मकार समाजाचे मुख्य कार्यकर्ते सचिन काळे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता तर त्याचवेळी अशोक पवार, महेश पवार, नरेश पवार यांच्या कुटुंबातील सदस्यांनी सुद्धा काँग्रेस पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले होते त्यांनी काही कारणास्तव पुन्हा एकदा शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे

याबाबतीत त्यांना विचारले असता शिवसेनेच्या कामाची पद्धत आणि तळा–गाळातील लोकांशी नेहमीच जनसंपर्क असल्याने हा पक्ष नक्कीच गावाला विकासाच्या प्रवाहात नेण्यासाठी कटिबद्ध असल्याने शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारले असल्याचं सांगितले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाना आत्मचिंतनाची गरज दिसते असेही बोलले जात आहे.

संत रोहिदास नगर मधील लोकांना आपल्या पक्षात आणण्यासाठी नगरसेवक नरेश काळे आणि युवा कार्यकर्ते श्रेयस गायकवाड यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. प्रसादभाई जनसंपर्क कार्यालयात सातत्याने पक्षप्रवेश करणाऱ्या लोकांची गर्दी दिसत असून अनेक लोक शिवसेनेचे सदस्यत्व स्वीकारण्यासाठी स्वेच्छेने पुढे येत आहेत. त्यामुळे आगामी काळात नगरपरिषदेवर पुन्हा एकदा शिवसेना आपले वर्चस्व प्रस्थापित करणार असा विश्वास समस्त शिवसैनिकांना वाटत आहे. नुकताच पार पडलेल्या पक्षप्रवेश या छोटेखानी कार्यक्रमात शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, गटनेते प्रसाद सावंत, नगरसेवक शकील पटेल, नरेश काळे, जेष्ठ शिवसैनिक अवधूत येरफुलें, योगेश जाधव, मित्र पक्षाचे (आरपीआयचे) अध्यक्ष अनिल गायकवाड, सिताराम शिंदे, सूर्यकांत कारंडे,नितीन सावंत, मिथुन कदम, गणेश घावरे, समीर पन्हाळकर, सलीम महापुळे, बंटी शिंदे, महेश काळे, सुभाष काळे, राजा काळे,अक्षय सोनावणे, युवा सेनेचे निमेश मेहता, लक्ष्मण कदम, माजी नगरसेवक दिपक जाधव, यांसह अन्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुसळधार पावसात केलटे ग्रामपंचायतीचा साकव गेला वाहून

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

जुलै दि.११–१२ रोजी पडलेल्या धुँवाधार पावसात केलटे ग्रामपंचायतीचा कुणबी समाज स्मशान भूमीकडे जाणारा साकव वाहून गेल्याची घटना घडली. दि.११ व १२ जुलै या दोन दिवसांच्या कालावधीत अनु.२१० व १२३ मि.मि. पावसाची नोंद झाली आहे. स्मशान भूमीकडे जाणारे अन्य दोन पर्यायी रस्ते आसल्याने ग्रामस्थाना स्मशानात जाणे अडचणीचे होणार नाही.

सुरवातीपासून वादग्रस्त असणारा साकवा चा भराव जोरदार झालेल्या पावसात वाहून गेल्याने साकवासाठी संपलेले रु ५ लक्ष वाहून गेल्याची चर्चा आहे. नोव्हों. २०१९ च्या ग्रामसभेत सदर साकवाची मागणी केली होती.

साकव बांधताना शेजारील बागायतदारांचे बागायतीना धोका होऊ नये अशा पध्दतीच्या मागण्या शेतकऱ्यांच्या होत्या, साकव बांधलेल्या पाहिल्याच वर्षात ग्रामपंचायतनिधीचे झालेले आर्थिक नुकसान शेतकऱ्यांच्या जिव्हारी लागले. सदर साकवासाठी जिल्हा नियोजन ५०४४ मधून ५ लक्ष निधी मंजूर झाला, कामाचे E Tendarning होऊन काम सुरु आहे.



### मुंबई-पुणे एक्सप्रेस वर आरटीओची द्रुतगती मोहीम...

# नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून अपघाताला निमंत्रण देणाऱ्या वाहन चालकांवर आरटीओ ने कारवाई केली. पनवेल पेण पिंपरी चिंचवड या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या भरारी पथकाने ही मोहीम राबवून नियम मोडणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई केली. यापुढेही अशाच प्रकारच्या मोहिमा प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून राबवल्या जाणार आहेत.



मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहने ये–जा करतात. या वेगवान रस्त्यावर वेगमर्यादेचे सर्रास उल्लंघन केले जाते. त्याचबरोबर अवजड आणि इतर वाहनांकडून लेन कटिंग केली जाते. त्याचबरोबर इतर वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. या कारणाने अपघाताला एक प्रकारे निमंत्रण दिले जाते. काही दिवसांपूर्वी बोर घाटात अशाच प्रकारे भीषण अपघात घडला होता. दररोज लहान–मोठे अपघात द्रुतगती महामार्गावर होतात. यामुळे अनेकांचे नाहक बळी जातात. या सर्व दृष्टिकोनातून आरटीओ, वाहतूक आणि महामार्ग पोलिसांकडून सातत्याने जनजागृती आणि प्रबोधन केले जाते. तरीसुद्धा वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. या सर्व दृष्टिकोनातून परिवहन विभागाकडून भरारी पथकाच्या माध्यमातून नुकतीच मोहीम राबवण्यात आली. १ हजार १६ वाहनांवर कारवाई करण्यात आली.वेगाने वाहने चालविणे, लेन कटिंग, सिटबेल्ट, प्रवेश निषेध असताना प्रवेश करणे, मोबाईल वर बोलणे, वैध कागदपत्रे नसने, ओव्हरलोड, क्षमतेपेक्षा जास्त मालवाहू नेणे अशा वाहनचालकांवर आरटीओकडून कारवाईचा बडगा उगारण्यात आला. त्यांच्याकडून २३ लाख ७१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

मागील महिन्यांपासून द्रुतगती महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे. महामार्गाच्या वेगावर नियंत्रण महत्त्वाचे आहे. वेगमर्यादा व लेन कटिंगचे उल्लंघन करणार्यां वर दंडात्मक कारवाईमुळे अपघातांचे प्रमाण घटण्यास मदत होणार आहे. वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवल्यास व लेन कटिंगचा मोह टाळल्यास अपघातांचे प्रमाण निश्चित मोठ्या प्रमाणात कमी होईल, असे मत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अनिल पाटील यांनी केले. द्रुतगती महामार्गावरील अपघात कमी करण्यासंदर्भात दंडात्मक कारवाईचा सुरू केल्याने वाहनांची वेग मर्यादा ताशी १०० आणण्यात यश आले आहे. त्यामुळे काही प्रमाणात अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली असल्याचेही पाटील म्हणाले.

# वायमॅक स्पोर्ट्स आयोजित पिकलबॉल महा इंटर क्लब स्पर्धेत प्रबोधनकार ठाकरे संकुल विजेता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नुकत्याच पार पडलेल्या पहिल्या पिकालबॉल महा इंटर क्लब स्पर्धा पार्ल्यातील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात पार पडली या स्पर्धेचे उद्घाटन वाकोला परिमंडळ सहाय्यक पो–लीस आयुक्त अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते आणि छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती(रजि.) संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू व सचिव डॉ.मोहन अ. राणे यांच्या उपस्थितीत पार पडली.



दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील ८ अग्रगण्य क्लब च्या संघांनी भाग घेतला होता अतिशय चुरशीच्या झालेल्या स्पर्धेत प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या संघाने जळगाव संघाचा ४– १ एवढया ने पराभव करत जेतेपदावर नाव कोरले याच बरोबर पहिल्यांदाच आयोजित झालेल्या महिलांच्या सांघिक सामन्यात टीम फ्युजन गर्लच्या संघाने बाजी मारली.

सदर स्पर्धेत अनन्या पाटील आणि वृषाली ठाकरे यांनी चमकदार कामगिरी करत विजेतेपद खेचून आणले. पुरुषांच्या सामन्यामध्ये विशेष चुरस दिसून आली पिकलबॉल सारख्या वैयक्तिक खेळामध्ये भारतात पहिल्यांदाच आयएफपी एआयपीए आणि एपीएफआय मान्यताप्राप्त सांघिक क्लब स्पर्धा एवढया मोठ्या स्तरावर आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेचे यजमानपद यंदा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाने भूषविले आणि कोरोना नियमांचे काटेकोरपणे पालन करत सदर स्पर्धा पार पडली या स्पर्धेसाठी भारतीय पिकल बॉल संघटनेचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू यांचे विशेष पाठबळ आणि मार्गदर्शन लाभले. पिकलबॉल खेळ तुलनेने नवीन असूनही दिवसेंदिवस या खेळाची लोकप्रियता वाढत आहे आणि म्हणूनच वायमॅक स्पोर्ट्स या आंतरराष्ट्रीय कंपनीच्या माध्यमातून अतिशय माफक दरात पिकलबॉल खेळाचे साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी सर्व खेळाडूंनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन वाय मॅक स्पोर्ट्सचे अध्यक्ष मकरंद येडूरकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशोधन देशमुख निखिल मथुरे, अभिजित शिंदे, अमोल जोगळे, ऋषभ राऊत, राहुल घाणेकर, अभिषेक सावंत यांनी मेहनत घेतली.

# खांदा वसाहतीत सेनेचे शिवसंपर्क अभियान ; वृद्धाश्रम आणि झोपडपट्टीत फळ वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पक्षसंघटना वाढीच्या दृष्टिकोनातून शिवसेनेच्या वतीने राज्यभर शिव संपर्क अभियान घेण्यात येत आहे. त्याची सुरुवात खांदा वसाहतीत करण्यात आली. शहर प्रमुख सदानंद शिर्के यांच्यासह इतर स्थानिक पदाधिकार्यींनी वृद्धाश्रम आणि झोपडपट्टीत फळ वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री तथा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यातील सर्व जिल्हा प्रमुखांची बैठक घेतली. जिल्हानिहाय त्यांनी आढावा घेतला. त्याचबरोबर आगामी महानगरपालिका, नगरपालिका तसेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकां संदर्भातही जिल्हाप्रमुखांची मत जाणून घेतली. त्याचबरोबर पक्षसंघटना वाढीच्या दृष्टिकोनातून या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यानुसार शिव संपर्क अभियान राज्यभर राबविण्यात येणार आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रा–तही या अभियानाला सुरुवात झाली आहे. खांदा वसाहतीत शहरप्रमुख सदानंद शिर्के यांच्यासह इतर स्थानिक पदाधिकाऱ्यांनी जनसेवा वृद्धाश्रम त्याचबरोबर दिवा पनवेल रेल्वे मार्गालगत असलेल्या झोपडपट्टीत फळवाटप केले. शिर्के यांच्या कन्या सोनल हिच्या वाढदिवसाचा दुहेरी योग साधून हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. यावेळी शिवसेना विधानसभा संघटक दिपक निकम, शहरप्रमुख सदानंद शिर्के, उपशहरप्रमुख दत्तात्रेय महामुलकर, संपत सुवर्णा, उपशहरसंघटक संजीव गमरे, उपविभाग प्रमुख जयराम खैरे, विभाग संघटक श्रीहरी मिसाळ, उपविधानसभा अधिकारी सुशांत सावंत, युवासेना उपशहर अधिकारी आदीत्य मेमाने, शाखाप्रमुख सुनील औटी, सचिन धाडवे, मंगेश पवार, पुंडलिक म्ह–त्रे, उपशाखाप्रमुख भास्कर साळवी, गणेश साबळे, जयवंत भायदे, गटप्रमुख केशव सुवरे, शाखा अधिकारी सौरव महामुलकर, ऋषीकेश घुले, जेष्ठ शिवसैनिक तानाजी घारे, दत्ताराम पाटील,भोजराज होटकर, माजी शाखा प्रमुख रामदास गोंधळी सायली शिर्के उपस्थित होते.

# लायन्स क्लब मांडवाच्या अध्यक्षपदी मोहन पाटील उपाध्यक्ष बाळकृष्ण कोळी, सचिव हर्षद पाटील, खजिनदार अजय अंगणे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

लायन्स क्लब ऑफ मांडवाच्या २०२१–२२ या वर्षासाठीच्या कार्यकारिणीचा पदग्रहण व शपथविधी समारंभ आगरसुरे फाटा येथील राऊत मंगल कार्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला. या समारंभात लायन्स क्लब ऑफ मांडवाचे नवनिर्वाचित अध्यक्ष मोहन दिनकर पाटील, उपाध्यक्ष बाळकृष्ण कोळी, सचिव हर्षद पाटील, खजिनदार अजय अंगणे व इतर पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाची सूत्रे हाती घेतली.

या प्रसंगी लायन्स क्लब मांडवाच्या नवीन कार्यकारिणीतील अध्यक्ष मोहन पाटील, उपाध्यक्ष बाळकृष्ण कोळी, सचिव हर्षद पाटील, सहसचिव सुमित पाटील, खजिनदार अजय अंगणे, सहखजिनदार विलास पाटील, टेल व्टिस्टर सारिका पाटील, टेमर मानसी पाटील, तसेच कार्यकारिणी संचालक नितीन अधिकारी, सुबोध राऊत, जितेंद्र ठाकूर, जितेश्री ठाकूर, मिलिंद म्हात्रे, डॉ. राजेंद्र मोकल, विद्या अधिकारी, स्मितल शिरगावकर यांच्यासह क्लब अँडमिनीस्टर विजयराव देशमुख, क्लब मेंबरशिप चेअरपर्सन अमिष शिरगावकर, क्लब लिडरशिप चेअरपर्सन सतीश म्हात्रे, क्लब सर्व्हिस चेअरपर्सन नितीन दांडेकर, एल.सी. आय.एफ.को–ऑर्डिनेटर धवल राऊत, बुलेटीन एडिटर निकीता पाटील, मार्केटिंग चेअरपर्सन ऋग्वेद ठाकूर यांनी शपथग्रहण करुन पदभार स्वीकारला, तसेच पाच नवीन सदस्यांनीही शपथग्रहण केले. या कार्यक्रमात कोविड काळात सेवा केल्याबद्दल डॉ. राजेंद्र मोकल व डॉ. राजाराम हुलवान यांचा सत्कार करण्यात आला.